राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचेप्रमाणे वेतन व भत्ते लागू करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : कृउबा-०७१४/प्र.क्र.१३७/२१-स,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २८ ऑगस्ट, २०१४.

**वाचा** :- कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.कृपमं/सुधारीत वेतन/सवलती १११२/२०१४, दि.१७.७.२०१४

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांनी राज्यातील बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व भत्ते लागू करण्याबाबत शासनाकडे विनंती केलेली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन परिपत्रक :-**

राज्यातील ज्या बाजार समित्यांना त्यांच्या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे वेतन व भत्ते देणे आर्थिकदृष्टया शक्य आहे त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना आस्थापना खर्चाच्या मर्यादेत शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शासनाने जाहीर केलेल्या दिनांकापासून वेतन व भत्ते अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु. बा. तुंबारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

1) मा.अपर मुख्य सचिव (पणन), मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
2) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
3) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
4) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
5) सभापती/ सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)
6) सभापती, महाराष्ट्र बाजार समिती सहकारी संघ, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे
7) श्री.दिलीप डेबरे,अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाजार समिती कर्मचारी संघ, पुणे
8) निवडनस्ती (२१-स)

C:New 21-C/Marketing BOARD/ LETTER MKP.rtf